**महाराष्ट्र शासन**

**इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

**कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर** – 440 022

**दूरध्वनी क्र.**0712- 2959381 CIN No. U85300PN2019NPL187405 **ई-मेल**: mahajyotingp@gmail.com


**कृपया प्रकाशनार्थ** **दि. 26 नोव्हेंबर 2023**

# ‘युपीएससी’ प्रशिक्षण चाळणी परीक्षेचा 3 दिवसात निकाल : ‘महाज्योती’

# विद्यार्थ्यांची संवर्गनिहाय मेरिट यादीतूनच होणार निवड

ओबीसी, व्हिजेएनटी व एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) नागपूर संस्थेमार्फत नुकतीच केंद्रीय लोकसेवा आयोगासाठी (युपीएससी) प्रशिक्षणासाठी चाळणी परीक्षा घेण्यात आली होती. तसेच या परीक्षेचा प्रारूप निकाल बैठक क्रमांकानुसार प्रसिद्ध केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या मनात कोणतीही शंका राहू नये म्हणून विद्यार्थ्यांचे आक्षेप सुद्धा महाज्योती तर्फे मागविण्यात आले आहेत. या प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांनी नव्याने काही प्रश्नांच्या उत्तरावर आक्षेप घेतलेला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सेट-2 चा समावेश आहे. या सर्व आक्षेपाचे निराकरण करण्याची प्रक्रिया सुरू आहे. येत्या 3 दिवसांमध्ये ज्या प्रश्नांबाबत संदिग्धता आहे. त्या प्रश्नांची सुधारित उत्तरे प्रसिद्ध करून सुधारित निकाल लावल्या जाईल व त्यानंतर संवर्गनिहाय मेरिट यादी जाहीर करण्यात येईल. अशी माहिती महाज्योतीचे व्यवस्थापकीय संचालक श्री. राजेश खवले यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.

श्री. राजेश खवले यांनी सांगितले की, ज्या विद्यार्थ्यांनी अनाथ, दिव्यांगत्व तसेच जात प्रवर्गाबाबत माहिती भरलेली नाही त्यांना देखील संधी देण्यात आलेली आहे. माहिती भरण्याचा शेवटचा दिवस दिनांक 26 नोव्हेंबर 2023 आहे. ही सर्व प्रक्रिया करून लवकरच निकाल लावल्या जाईल. याकरिता 3 दिवसापेक्षा अधिक कालावधी लागणार नाही. ‘महाज्योती’चे सर्व अधिकारी कर्मचारी याकरिता सुट्टीच्या दिवशी देखील कार्यरत आहेत, असल्याचेही श्री. खवले म्हणाले.

## विद्यार्थ्यांनी संभ्रम ठेवू नये; महाज्योतीचे आवाहन

कोणत्याही विद्यार्थ्यांची हाती आलेली संधी निघू नये, केवळ माहिती भरली नाही म्हणून विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये याची परिपूर्ण काळजी महाज्योतीद्वारे घेतली जात आहे. येत्या 3 दिवसांमध्ये निकाल जाहीर होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांनी या अनुषंगाने कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये असे आवाहन करण्यात संस्थेद्वारे करण्यात आले आहे. शिक्षणाचे महत्व अबाधित असल्यामुळे विद्यार्थ्यांच्या स्वप्नांची दारांची चावी महाज्योती योग्य प्रशिक्षणातून मिळवून देत आहे. भविष्यात यशस्वी करीयर घडविण्याचा मार्ग मोकाळा करण्याचा मानस संस्थेचा आहे. यानंतरच विद्यार्थ्यांना शासन सेवेत योग्य व्यासपीठ हे ‘महाज्योती’ करून देत असल्याचेही श्री. राजेश खवले यांनी सांगितले.

**प्रति,**

**मा. संपादक**

**प्रिंट, ईलेक्ट्रॉनिक, डिजीटल माध्यम**

**महोदय, उपरोक्त वार्तांकन आपल्या लोकप्रिय माध्यमात प्रसिद्धी करावे.**

**कुणाल शिरसाठे**

**प्रकल्प व्यवस्थापक**

**महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),**

**महाराष्ट्र राज्य, नागपूर**